सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

Tel. No.: 022-22620332
Email : pressroom.mum@mahapolice.gov.in

Government of Maharashtra
**Police Department**
Office of the Commissioner of Police,
Dr. D.N. Road, Mumbai-400001.

O.W.No. 372/2021

Date :- 23 / 07 / 2021

## प्रेस नोट

दि. १६/०५/२०२१ रोजी ०१.४० वा. शासकीय वसाहत बिल्डिंग नं. ६ चे समोर दक्षिण वाहिनी, पश्चिम द्रुतगती महामार्ग बांद्रा, (पुर्व) मुंबई येथे एका इसमास दोन अनोळखी इसमांनी डोक्यावर, चेहऱ्यावर, हातावर कोयत्याने व पेवर ब्लॉक मारुन त्याचा क्रुरपणे खून केला. म्हणून फिर्यादी यानी दिलेल्या फिर्यादी वरुन खेरवाडी पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २१६/२०२१ कलम ३०२, १२०(ब), ३४ भा.दं.वि. सह कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा सह ३७ (१)(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा अतिशय गंभीर असल्याने मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ –०८, सहा. पोलीस आयुक्त, खेरवाडी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आला. तपासकामी पोलीसांची ४ पथके तयार करुन तांत्रिक तपासाद्वारे खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीद्वारे तसेच बुध्दीकौशल्याने अतिशय मेहनत घेवून खेरवाडी पोलीसांनी तपास करुन अनोळखी मयत इसमाची ओळख पटवून अवघ्या दोन दिवसांत चार आरोपींना ठाणे व नालासोपारा येथून ताब्यात घेवून अटक करुन गुन्हा उघडकीस आणला. तसेच अटक आरोपीतांकडून गुन्हयात वापरलेला कोयता व पेवर ब्लॉक हस्तगत करुन सदरचा गंभीर गुन्हा कमी कालावधीत उघडकीस आणुन जनमाणसातील मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचाविण्याचे सर्वोत्कृष्ट कार्य कले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस उप–आयुक्त, परिमंडळ–८, मुंबई व श्री. कैलास आव्हाड सहाय्यक पोलीस आयुक्त, खेरवाडी विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार खेरवाडी पोलीस ठाण्याचे वपोनि. श्री. संजय निकुंबे पोनि. पाटील (गुन्हे) , पोनि. बागडी, तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. सचिन सुर्यवंशी, सपोनि. पांडुरंग लोणकर, पोउनि. फुंदे, पोउनि. शिंदे व पथकांतील अंमलदार पोह. भानुदास भोसले, पोशि. गणेश बाराहाते, पोशि. रवि गायकवाड, पोशि. निखिल मोरे, पोशि. प्रमोद पाळदे, पोशि. विनायक गवळी, पोशि. योगेश सटाले, पोशि. दिपक कांबळे पोशि. प्रशांत धायगुडे यांनी केलेल्या या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल दि. २२/०७/२०२१ रोजी ११:३० वा. मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयात विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देवून त्यांचा गौरव केला आहे.

( चैतन्या एस. )
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.

Scanned with CamScanner